# प्रकरण सहावे

# लक्ष्मण गायकवाड यांच्या उचल्यामधील वेदना व विद्रोहाचे स्वरुप

# प्रकरण ६ वे

# लक्ष्मण गायकवाड यांच्या 'उचल्या' मधील वेदना आणि विद्रोहाचे स्वरुप.

स्वातंत्र्योत्तर काळात जी महत्वाची नवी सांस्कृतिक परिवर्तने झाली त्यात दलित साहित्य निर्मितीला अग्रस्थान द्यावे लागेल. शतकानुशतके जो दलित समाज ग्रांथिक संस्कृतीपासून वंचित राहिला होता तो समाज यामुळे साहित्याभिमुख बनला. साहित्य क्षेत्रात परंपरेने चालत आलेली अभिजनांची मक्तेदारी संपुष्टात आली. साहित्याचे एक प्रकारे लोकशाहीकरण झाले. मराठी साहित्यात आणि संस्कृतीत एका नव्या पर्वाला प्रारंभ झाला.

''जुने जाऊ द्या मरणालागुनी, जाळूनि किंवा पुरुनि टाका''[१]

याप्रकारे नव्याचा शोध सुरु झाला. भविष्य काळासाठी सुंदर लेणी त्यांना आकाराला आणायचे आहे. त्या लेण्यात माणूसकीचे कोंदण बसवायचे आहे. जे सडलेले आहे, कुजलेले, नासलेले माणसाला बेरुप करणारे आहे ते त्यांना नको आहे.

''आज मी ऊभा आहे, माझ्या समर्थ हातात कुंचला घेऊन
अशाही भाऊगर्दीत माझ्या वेदनांचे विश्व रंगविण्यासाठी

मी कुठे असेन, तोडू शकत नाही, त्यांच्याशी नाळ
माझ्या स्वागतासाठी सिध्द आहे, प्रकाशमान भविष्यकाळ''[२]

अशाप्रकारे आपल्या वेदनांना आकार देत भविष्य काळातील सुंदर स्वप्ने पाहिली गेली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळ उभी राहिली, औद्योगिकरण झाले, उदारमतवादी दृष्टीकोन जागा झाला. वेगवेगळी धरणे, शाळा, महाविद्याले दळणवळणांच्या साधनांचा विकास झाला, हजारे हिंदु दलितांनी धर्मांतर केले तरीही हिंदू धर्माचा विचार बदलला नाही, मूल्ये बदलली नाहीत, ज्या धर्मात माणूसकी नाही त्या धर्मात कोणताही मनुष्य जास्तकाळ थांबत नाही. यासाठी डॉ. आंबेडकरांनी बौध्द धर्म स्विकारला, महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह केला, माणूस म्हणून माणसासारखे जीवन त्यांनी दलितांना जगायला शिकवले. या आत्मकथनामागे हीच जाणीव पानोपानी दिसते.

१५ ऑगस्ट १९८७ या दिवशी हे आत्मकथन प्रकाशित झाले. या आत्मकथनात

लेखकाने स्वसमाजाबरोबरच हिंदू धर्म, हिंदू संस्कृती विविध भयावह अशा चालीरिती, परंपरा आणि हिंदू धर्माने माणसाची केलेली थट्टा वर्णन केलेले आहे. आपल्या लेखनामागील भूमिका वर्णन करताना ते सांगतात ''लहानपणापासून माझ्या अवतीभवतीच्या या उचल्या लोकांचे दारिद्र्य, ससेहोलपेट मी पहात राहिलो. हळूहळू कार्यकर्ता म्हणून उभा राहिलो. या समाजात जगत असताना प्रत्येकाला गुदमरल्यासारखे वाटत असते. त्यांच्या व्यथा मी व्याख्यानातून, चर्चेतून मांडत असतो. माणूस म्हणून स्वकर्तृत्वावर आपण जगायला पाहिजे, शिकले पाहिजे, संघटीत झाले पाहिजे हे यांना पटवून देत असतानाच जाणवू लागले की, तथाकथित प्रतिष्ठितांना, बुध्दिवाद्यांना, मध्यमवर्गीयांना या समाजाच्या दु:खाची अजिबात कल्पना नाही. म्हणून ही सर्व दु:खे लोकांच्याा समोर मांडावी हा या लेखनप्रपंचाचा हेतु''.[३]

अशाप्रकारे आपल्या समाजाला शहाणे करण्याबरोबरच सवर्णसमाजाचेही उद्‌बोधन करावे हा या लेखनामागील हेतु आहे.

१) **वेदना :** या आत्मकथनात लेखकाने आपल्या समाजाच्या वेदना साकार केल्या आहेत. भूक आणि निवाऱ्यासाठी कायदेशीर रस्ते बंद झाल्यामुळे चोरी करुन जगणारी ही जमात आहे तर दुसऱ्या ठिकाणी राजरोसपणे लाखो रुपयाचा भ्रष्टाचार केला जातो परंतु त्यांना प्रतिष्ठा मिळते. पण कुठेतरी पोटासाठी दहा - वीस रुपये चोरणाऱ्याला गुन्हेगार म्हणून खडी फोडावी लागते. आपला समाज जेव्हा जेव्हा काही नवी पावले टाकण्याचा प्रयत न करतो तेव्हा या समाजाला झिडकारले जाते. याचं दु:ख वर्णन करताना ते म्हणतात ''त्या शाळंत मी नवीन व्हतो. मला हे समदे येगळं वाटू लागलं लांडग्याच्या शेळी शिरल्यागत मला समदे पोरं उचल्याचा लक्ष्या शाळत आला म्हून कुनी खडं मारायचं तर कुनी ''लच्छीमन ताता खेकड्याची आमटी खाता का'' म्हनून चिडवायचे.[४] याप्रमाणेच सवर्ण समाज आपल्या समाजाकडे फक्त एक उपगोग्य वस्तु म्हणूनच पाहतो या वेदनेचही ते वर्णन करतात. या समाजाने सुधारावे, शिक्षण घ्यावे, माणूसकी मिळवावी असे सवर्ण समाज कधीच इच्छित नाही तर, या समाजाला तो आडाणी, अज्ञानी ठेवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो. या समाजाची लुबाडणूक करतो, स्वत: धनदांडगा होतो. या वेदनेचं वर्णन करताना ते आपल्या समाजातील चिंगूची कथा सांगतात ती लेखकाची मावस बहिण होती. ती चाऱ्या करण्यात वाकबगार होती. एकावेळेला ती दोन तीन छटाक सोने आणायची, जाईल तिथं भरपूर पैसे खर्च करायची. एकदा तुळजापूरच्या देवीचा गोंधळ तिने मांडला. बोकूड कापून सगळ्यांना जेवण दिले व मोठे चार- पाच गाडगे शिंदी ती प्याली आणि अचानक चक्कर येऊन खाली पडली त्यातच मरुन गेली. तीसच्या आत तिचं वय होतं. तिच्या मातीला सोलापूरहून बरेच लोक आले होते. त्यात किलोच्यावर सोने ज्याला विकले होते तो सोनारही आला होता.

चिंगू मेली म्हणून पाचशे रुपयाची पैठणी त्यांनी आणली होती. तिच्या जीवावरच त्याने तीन मजली इमारत बांधली होती. म्हणून तो मोठमोठ्याने रडू लागला ''चिंगू तू एवढ्याा लवकर मरायची नव्हतीस असं कसं झालं रे देवा'' म्हणून तो ऊर बडवून रडत होतो. चिंगूमुळे तो श्रीमंत झाला होता. चिंगूसाठी त्याने ही इनामदारी केली होती पण आज चिंगूच्या लेकरांचे हाल होत आहेत. चिंगूसारख्या चोऱ्या त्यांना कराव्या लागतील. आमचेच लोक त्यांना शिकवतील अशा प्रकारे सवर्णसमाज आपल्या समाजापासून कसा फायदा उठवतो याची वेदना ते वर्णन करतात. याप्रमाणे आपल्या समाजातील लोकांना बाहेरगावी जायचे असल्यास त्या गावच्या पोलिसपाटलाचा दाखला लागायचा. हा दाखला देण्यासाठी पाटील भरभक्कम पैसे घ्यायचा. बिना दाखल्याचं कुणीबी, कुठबी फिरता येत नव्हतं ''जर जनावराला कुठं विकायचं झाल, अगर दुसऱ्या गावाला न्यायचं झालं तर जसा दाखला लागतो अन् बिगर दाखल्याचं जनावर घेत नाहीत तस त्या जनावरासारखी आमच्या उचल्याच्या लोकांची गत होती. पोलीस पाटलाचा दाखला असेल तरच दुसऱ्या गावात तेही तीनच दिवस राहयला येतं. दाखला नसेल तर त्या गावचा पोलिस पाटील चोर म्हणून धरुन देतो''.[५] अशा प्रकारे लेखकाने आपल्या समाजातील वेदना वर्णन केलेली आहे. त्या प्रमाणेच आपल्या समाजात असणारी गरीबी व त्यामुळेच हा समाज चाऱ्या करतो नाही नाही ते धंदे करुन पोट भरतो, प्रसंगी देह विकतो, माणूसकीला पोरका होतो, जिवाभावाच्या रक्तानात्याच्या माणसाला तो दूर करतो. यापाठीमागे अज्ञान, दारिद्र, उपासमार असते हे जरी खरे असले तरी यापाठीमागे एक मन असते. रागावैतागाने एखादी कृती घडते मात्र त्याची वेदना जन्मभर उराशी घेऊन जीवन जगावे लागते. लेखकाचा हरचंदा नावाचा भाऊ होता त्याला फेफरे येत होते, काहीच कामधाम करत नसल्यामुळे एकेदिवशी भर पावसात लेखकाने त्याला घराबाहेर हाकलून दिले, रागाच्या भरात लेखक त्याला मारायला अंगावरही गेले. पण तेंव्हा तो निघून गेला त्यानंतर तो पुन्हा भेटला नाही. याचं दुःख वर्णन करताना ते सांगतात ''जा कुठंबी जा, मर, भीक मागून खा उद्या लातूरात दिसू नकोस, नाहीतर पेोलिसाला धरुन देईन, आदिच तू चोऱ्या करतूस म्हणून पोलिसाला माहित आहे''. तवा घाबरुन जायला निघाला. त्याचे सर्व कपडे बांधून दिले आणि जात नसतानाही त्याला पावसात हाकलून दिले. तो जाता जाता म्हणाला ''मला तेवढी जोगवा मागून खायला आईची माळ अन् परडी तर दे. मी जातो, कुठबी तोंड काळं करतो, पुन्हा येणार नाही तुमच्याकडं''. मग मी घरातून माळ परडी आणून दिली. तो गेला त्याला दहा वर्षे झाली. तो आजून आला नाही गरीबीमुळे सख्या भावाला सांभाळू न शकल्यामुळे त्याला कायमचा हाकलून दिला. सख्या भावाची ताटातूट झाली. पुन्हा लई वाईट वाटलं, नंतर मी कुर्डुवाडी, बार्शी बरंच फिरलो सर्व भिकारी बघितलो. पर हरचंदाचा पत्ता नाही, तो मेला का जिवंत आहे हेबी माहित नाही. असं कधीतर

आठवण झाल्यावर काळजाला चर्रकर करतयं. आपल्या गरीबीनं कायकाय प्रसंग दाखवला,सख्खा भाऊ गरीबीनं संभाळता येत नाही म्हणून कायमचा मुकला, मेला असेल असंच मी समजतो.[६]

दुसऱ्या महायुध्दानंतर जगाच्या पाठीवरचे छोटे छोटे प्रदेश स्वातंत्र्याचे आकांक्षेने लढावयास सिध्द होऊ लागले. त्यांच्या मनात विचार बळावत चालला. तो हा की, आपण जुलमी सत्तेला संघटीत होऊन आव्हान देऊ शकतो. एक विचारधारा अशी आहे की, जर जग बदलून टाकायचे असेल तर माणसाची प्रकृती आणि त्याचे वर्तन बदलले पाहिजे. तर दुसऱ्या विचारधारेचा विश्वास असा आहे की, नवा माणूस निर्मिण्यासाठी सम्यक क्रांतीची जरुर आहे. दलित लेखकाला अभिप्रेत आहे तो नवा माणूस !

२) **विद्रोह :-** हा नेहमी मूल्याच्या प्रतिष्ठापनेसाठी असतो. एक मूल्यसमूह नाकारुन नवा मूल्य समूह अस्तित्वात यावा म्हणून विद्रोहाचा अवतार असतो. मूल्यभाव नसेल तर विद्रोहाला अर्थ नसतो. मूल्ये ढासळत चालली आहेत. समाजाचे सर्वच बाजूनी अध:पतन होत आहे. याबद्दल केवळ खंत करुन काय फायदा ! मूल्यभाव व विद्रोह यांच्यात घनिष्ठ संबंध आहे. विद्रोहाच्या प्रक्रीयेत जिवंत लेखक असतो. क्रियाशील लेखकच ते करु शकतो. अशिया, आफ्रिका, लॅटिन, अमेरिका इ. भागातील ज्या प्रदेशात हुकूमशाही प्रवृत्ती नांदत होत्या किंवा जेथे बंदुकीने न्याय दिला जात होता तेथील लेखकांनी विद्रोही भूमिकाच स्विकारली आहे. प्रतिगामी वृत्ती अन्याय व द्वेष ज्या देशात वाढत असतो तेथे विद्रोहाचा जन्म होतो. म्हणून डॉ. आंबेडकरांनी लढाऊ निग्रोच्या पावलावर पाऊल टाकून सर्वत्र विद्रोह व्यक्त केला पाहिजे अशी भूमिका जाणूनबुजून घेतली होती.

दलित लेखकाचा विद्रोह विशिष्ठ व्यक्ती, विशिष्ठ जमातीविरुध्द नाही तर हा विद्रोह सत्व शोधण्यसाठी आहे. प्रतिगामी प्रवृत्ती आणि कालबाह्य जीवनादर्श यांच्याविरुध्द हा विद्रोह आहे. उचल्या या आत्मकथनातील विद्रोह देखील याचप्रेरणेतून जन्माला आला आहे. या विद्रोहात एक चिंतनशीलता आहे. सुवर्ण समाजातील स्वार्थी सोयीनुसार मूल्ये बदलणाऱ्या, उकिरड्यावर जेवण देणाऱ्या, जिवंतपणी अन्न न देता मृत्युनंतर पंगती उठवणाऱ्या या संस्कृती विरुध्द विद्रोहाची भावना या लेखनातून व्यक्त झाली आहे. लेखकाच्या आजीने पाय घासण्यासाठी तुळजापूरहून एक दगड आणला होता. तेव्हा त्या आजीच्या अंगात आले व 'मी पाय घासायचा दगड नाही, मी तुळजापूरची आई हाय', असा इशारा मला मिळाला तेव्हा त्या दगडाला तिथंच बसवून लेखकाच्या घरच्याने देऊळ बांधले. तेंव्हा त्याची स्थापना करताना बकरे कापले गेले आईच्या समोरच गरदाड भरलं. बकऱ्याचं मुंडक बाजूला काढून पाय तोडून आईच्या पुंढ मुंडक आणि पाय ठेवले आणि परड्या भरण्यासाठी गावातल्या परड्या बोलाविल्या' आमच्यात महाली पाटलाच्या

परडीचा लई मान हूता. म्हनून मला पाटलाची परडी आणाया धाडलं. पाटलानं परडी दिली अन् म्हनला 'परडीत दुसरं कांही टाकू नका नुसत मटनचं टाका. आम्हाला पात्रुटाचं पीठ, मीठ चालंत नाही'.[७] या पाटलाच्या बोलण्यामुळे लेखकाला वाईट वाटलेले आहे. पाटलाला कोरडं पीठ, मीठ चालत न्हाय पर वल्ल मटन कसं चालत असेल या बद्दल ते चक्रावून गेलेले आहेत. यानंतर वर्षानुवर्ष या जातील भोगावी लागलेली गरीबी दारीद्रय या बद्दलही त्यांना भयंकर दु:ख आहे. लेखकाच्या कुटुंबात त्यांची आई. ही कर्तृत्ववान होती ती दुध दुभत्याचा धंदा करुन, शेळ्या - म्हशी पाळून कुटुंबाचा गाडा चालत असे त्यातच ती एकदा खूप आजारी पडली तेंव्हा तिला दवाखान्याला न्यायला दोन चार रुपये हवे होते, पण गावात कुणीही दिलं नाही. शेवटी आईनं विकत आणलेला पितळ्या आणि तांब्या बरोबर घेवून लेखकाचे वडील आई तुळशीराम लातूरला गेले तेथे ते सर्व विकून पुन्हा ही मंडळी जावळीला गेले त्यानंतर थोड्या दिवसात ही आई वारल्याचा निरोप मिळाला. ''मायच्या मातीला जान्यासाठी दादा दोन काश्याच्या पराती अन् तांब्या गहानवट ठेवाया गेला पर कुनी बी पराती अन् तांब्या ठेवून घेईना भांड्यावर आमचं नाव व्हतं. तरी बी चोरुनच आनलेले असत्याल म्हनून घेयाचे न्हाईत. तवा दादा कातावून म्हनला ''हे गावं हाय का, ह्येच्या मायची गांड, तांब्या ठेवून गाडगं मिळत नाही लातूरला नेहून विकतो. मी अन् हरचंदा रडत हुतो. तुळशीरामची माय गंगाबाय बाबाला म्हनाली मारतंडा, पोरला घेवून जा मायच तोंड बघू दे. तेंव्हा बाबा म्हणाला व्हय गंगाबाय, पर दामचं न्हाय म्या काय करु ? आमीच लातूरला ही पराती विकून भागवतूया. बाबा आन्ना दादा गेलं मला तर मायची लई याद येत हुती. तवा भाऊ घरला आला अनं मला गळ्याला लावून रडू लागला. काय दिसानं दादा ,अन्ना,बाबा, आले. मला परदेशी लेकरु म्हनून समदेच मया करु लागले. मला बी वाटलं माय मेली बरंच झालं. समदे आता माझी मयाच करतील.''[८] अशाप्रकारे गरीबीमुळे आईच्या अंत्य विधीला देखील जाता आले नाही. या गरीबी बद्दल लेखकाच्या मनात प्रचंड चीड आहे. ही गरीबी या जातीमुळेच आपल्याला प्राप्त झाली आहे. आज या समाजात प्रचंड परिवर्तन होत आहे. तरी ही जातीचा शिक्का पुसला जात नाही. व या जातीतील माणसाकडे गुन्हेगार म्हणून पाहिले जाते.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरु म्हणाले की, ''कोणतीही जात जन्मत: गुन्हेगार असू शकत नाही. आज भारत आझाद व मुक्त झाला म्हणून या गुन्हेगार जातींना विशेष मुक्त विमुक्त असे नावं दिले. पण आज स्वातंत्र्यानंतर ही पोलिस व शासन या जमातीची सुधारणा करण्या ऐवजी निश्पाप अशा स्त्रियावर व मुलावर खोटे आरोप लावून अटक करतात. भटक्या विमुक्तांच्या अशा कित्येक लोकांना पोलिस जन्मताच गुन्हा दाखवून त्यांना जेल मध्ये टाकतात. असे करुन खरे तर लहान मुलांना

गुन्हेगारीच्या खाईत लोटून टाकतात. एखादा पक्षी पाळताना तो उडून जावू नये म्हणून त्याचे पंख कापतात. त्यामुळे तो जन्मभर त्याच घरी राहतो. जरी त्यांने उडून जाण्याची इच्छा व्यक्त केली तर तो उडून जाऊ शकत नाही. त्याप्रमाणे या जमातीच्या लोकांना जन्मल्या बरोबर पोलिस कोठडी दाखविली की त्यांचा कायमचा संबंध कोठडीशी येतो, कुणी त्याला बाहेर काढण्याचा किंवा त्याने स्वत: बाहेर निघण्याचा प्रयत्न केला तरी तो या नरकातून बाहेर पडू शकत नाही. कारण त्याचे पंख कापलेले असतात. त्याच्या डोक्यावर गुन्हेगारीचा शिक्का मारलेला असतो.''[१]

आता हा शिक्का मारला जावू नये त्याचे पंख कापू नयेत. सवर्ण समाजाने माणूसकीचे वर्तन करावे. पोलिस अधिकाऱ्याने विनाकारण त्यांना त्रास देवू नये. धन दांडग्याने त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊ नये. या जमातीतील लोकांनी आता शहाणे व्हावे. शिक्षण घ्यावे ही या विद्रोहा मागची भावना आहे.

**'उचल्या'तील वेदना व विद्रोहाचे स्वरुप -**

१) **प्रामाणिक कार्यकर्त्यांची तळमळ -** या आत्मकथनातील वेदना आणि विद्रोहाचे स्वरुप पाहात असताना आपणाला असे दिसून येते, की या सर्व लेखनामागे एका प्रामाणिक कार्यकर्त्याची तळमळ आहे. व ही तळमळ व्यक्त करताना. त्याने लिहीले आहे की, ''मी लक्ष्मण गायकवाड हाडाचा कार्यकर्ता ज्या समाजात जन्मलो तो समाज वर्ण व्यवस्थेने व समाजव्यवस्थेने नाकारलेला, शेकडो नव्हे तर हजारो वर्षापासून मनुष्य म्हणून सर्वांच्याकडून नाकारलेला व पशुतूल्य जीवन जगण्यास भाग पाडला गेलेला. इंग्रज सरकारने तर गुन्हेगार म्हणून आमच्या जमातीवर शिक्का मारला व सर्वांनी गुन्हेगार म्हणून आमच्याकडे पाहिले व आजही पाहात आहेत. उपजिविकेचि सर्व साधने बंद केली गेल्यामुळे चोरी करुन जगणे हाच एकमेव पर्याय आमच्यासमोर राहिला. आमच्या या थोपवलेल्या व्यवसायाचा उपयोग वरच्यांनी स्वत:चे स्वार्थ पूर्ण करण्यासाठी केला. जन्मत:च गुन्हेगारीचा शिक्का बसवलेली ही जगातील एकमेव जमात असावी. हे असे का झाले ? याचा समाज शास्त्रीय अभ्यास कधीतरी होईलच. लहानपणापासून माझ्या अवतीभोवतीच्या या उचल्यांच्या लोकांचे दारिद्र व ससे होलपेठ मी पहात राहिलो. हळू हळू कार्यकर्ता म्हणून उभा राहिलो. या समाजात जगत असताना प्रत्येकाल गुदमरल्या साख्खे वाटत असते. त्यांचे व्यथा मी व्याख्यानातून, चर्चेतून मांडत असतो. माणूस म्हणून जगण्याचा आपणाला हक्क आहे. व या उचलेगिरी पासून दूर राहून स्व कर्तृत्वावर आपण जगायला शिकले पाहीजे. शिक्षण घेतले पाहिजे, अन्यायाच्या विरुध्द संघटीत झाले पाहिजे. व हे ह्यांना पटवून देत असतानाच हे जाणवू लागले की, तथा कथित प्रतिष्ठांना, बुध्दिवाद्यांना व मध्यम

वर्गीयांना या समाजाच्या दु:खाची अजिबात कल्पना नाही. म्हणून ही सर्व दु:खे लोकांच्या समोर मांडावीत हा या लेखन प्रपंचाचा हेतू. प्रस्थापितांनी आपले पूर्व ग्रह बाजूला ठेवून आमच्याबद्दल नव्याने विचार करावा. त्याच वेळी या जाती जमातीतून नव्या पध्दतीचे शिक्षण घेवून या समाजा बद्दलची बांधीलकी सांगावी या दुहेरी हेतूने मी या व्यथा मांडतोय." [१०]

अशा प्रकारे आपला विचार मांडून भूक आणि निवाऱ्यासाठी हा समाज चोरी करतो, तर दुसरीकडे कोट्यावधी रुपयाची कायदेशीर चोरी करणारे. तथा कथित, प्रतिष्ठित लाच आणि भ्रष्टाचारावर लाखो रुपये मिळविणारी माणसे गुन्हेगार समजली जात नाहीत. तर पोटासाठी दहा -वीस रुपयाची चोरी करणारे गुन्हेगार समजले जातात. या समाजावर शेकडो वर्षापासून अन्याय होत आहेत. यांच्या कल्याणासाठी कुठल्याच योजना राबविल्या जात नाहीत. माणूस म्हणून जगण्याचे हक्कच हिरावून घेतले आहे. हे हक्क एका रात्रीत मिळणार नाहीत. यासाठी सतत प्रबोधन, संघर्ष आणि संघटनेची गरज आहे. याबरोबरच सवर्ण समाजाने देखील या जातीबद्दल नव्याने विचार करण्याची गरज आहे. अशाप्रकारे एका प्रमाणिक कार्यकर्त्याची तळमळ आपल्या लक्षात येते. नोकरीच्या शोधार्थ नॉन मॅट्रिक असणारा हा मुलगा लातूरला येतो. पुढे औरंगाबादला जातो. परत लातूरात येऊन कामगाराची संघटना उभी करतो. पुढे मराठवाड्यात भटक्या विमुक्तांची संघटना बांधतो. व समाज सेवेसाठी रात्रीचा दिवस करुन चालत राहतो. प्रसंगी स्वत: उपाशी राहतो पण समाजाची सेवा करण्याची एकही संधी तो सोडत नाही. अशा प्रकारे भारावून जावून तो समाज कार्य करतो. पोटाचा प्रश्न न सुटल्यामुळे, व राजकीय लोकांनी त्याला 'बळीचा बकरा' बनविल्यामुळे या क्षेत्रात तो अपयशी ठरतो तरी त्याने 'बचेंगे और भी लढेंगे' या न्यायाने आपली वाटचाल चालू ठेवले आहे. या वाटचालतील प्रत्येक प्रयत्न मात्र प्रमाणिक आहे.

२) **दारिद्रयाचे दर्शन :-** पिढ्यांपिढ्या हा समाज अज्ञानाच्या खाईत जीवन जगतो आहे. जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या मुलभूत गरजा ही त्यांच्या पूर्ण होत नाही. त्यापूर्ण करण्यासाठी तो धडपडतो पर्यायाने गुन्हेगारी कडे वळावे लागते आणि दारिद्रयाचे जिणे सोबतीला येते. या विदारक सत्त्याची जाणीव आपणाला होते. अर्थात या समाजाचे दारिद्रय सर्व स्तरावरचे आहे. या दारिद्रयाच्या पायीच घासभर तुकड्यासाठी लोकाच्या दारात तासंतास उभे रहावे लागते. इतरांच्या पाया पडावे लागतात. याचे वर्णन करताना ते सांगतात. 'कदी कदी दादाची बायको गावात जातं उपटाया जायची तवा मी बी तीच्या संगं गुनी घेवून जायचा गुनीत एक गारगोटी, उनि टाकी न्हायंच. लाकडाच्या ढलप्या न्हायच्या. भाबी जातं काडायची. जातं काडण्याधीच कुणब्याच्या बाया जात्यातल्या पिटाला शिवूनये म्हणून

आदुगरच पीट काढून घ्यायच्या. त्येच्यानं भाबी कदी कदी मला गेल्या बरुबर जात्याला शिवाय सांगायची म्हनजी जात्यातलं पीट बाटलं की, आपल्यालाच मिळतं अनं उकटायचा एक अनाबी मिळतंय म्हनून मी आदी गेल्यावर जात्याला शिवायचा भाबी म्हनायची, लेकरु भुक्याजलं, मालकीन लेकराला शिळा तुकडा बिकडा द्याकी, मग कवा कवा शिळी भाकर, शिळं कोरड्यास ताक घ्यायच तवा मी गरबडीनं गोनीतली वाटी काडायचा अनं त्यात वाढून घ्यायचा. अनं तिथच खायचं. जातं उकटायचा धंदा रोज चालायचा न्हाय पर दुध विकू लागल्यानं आमची बंडाळ व्हायची न्हाय'.[११]

अशाप्रकारे या दारिद्र्यामुळेच माणसा सारख्या माणसाला जनावराप्रमाणेच बाजारात नेवून विकावे लागते. हा अनुभव सांगताना. आपल्या नवाड्या भाबीची कहाणी ते सांगतात. ही भाबी आपल्या भावाने थापा मारुन पळवून आणलेली असते. ती समंजस, कष्टाळू, प्रमाणिक असते. कुटुंबात होणाऱ्या भांडणामुळे उपासमारीमुळे या भाबीला कर्नाटकात नेवून विकले जाते.' याचं वर्णन ते करतात. की, 'आमच्या गावच्या किसन पाटलानं अन् दादान् निलंग्याकडं कर्नाटकाच्या भागात जाऊन आले. तिथं एक गडी बगीतला, अन् एका दिवशी दादा, किसन पाटील नवाड्या भाबीला घेवून गेले. घरात मातर मी रडलो. बरं वाटू लागलं. तिथं सुखात ऱ्हाईल. दादा म्हणत होता. घर चांगल हाय, अखेर तीला घेवून गेले किसन पाटील, दादा म्हागारी आल्यास समजलं, त्या गड्याला पदमीन भाबीला दोनशे पन्नास रुपयाला विकलं. किसन पाटलानं शंभर रुपये दलाली घेतली अन् दादानं दिडशे रुपये आणलं घरात लई बंडाळ व्हती. त्या दिडशे रुपयाचे दाणे, मीठ, मीरचू आणून दिला. दादानं पद्मिनीला आनला बी. अन् ईकला बी. ईकल्यामुळे काई दिवस रोज दारु पिवू लागला'.[१२] या दारिद्र्याबरोबरच आपल्या समाजातील लोकांनाच वेळोवेळी भूक उपासमार अर्धवस्त्र या समस्येला तोंड द्यावे लागते. उदर निर्वाहाची निश्चित साधने नसल्यामुळे समाजात कोणतीही प्रतिष्ठा नाही. त्यामुळे उपासमारीला तोंड देण्यासाठी या समाजातील व्यक्ती अनेक अघोरी मार्गाचा अवलंब करतात. इतर समाजाने उतारा म्हणून टाकलेला निवद नारळ खातात. स्मशानातील निवद खातात. आकाड श्रावणात वेगवेगळ्या वनस्पतीचा पाला ओरबडून आणून शिजवून खातात.

अशाप्रकारे या आत्मकथनातून दारिद्र्य आणि या समाजाला वर्षानुवर्ष असणाऱ्या दारिद्र्याच्या सोबतीचे वर्णन आलेले आहे.

३) **मार्क्सवादी विचारसरणी :** कोणत्याही साहित्य कृतीतून युग प्रवृत्तीचे संदर्भ कमी अधिक प्रमाणात येत असतात. कोणतीही एखादी विचार प्रणाली कलाकृतीतून अभिव्यक्त होत असली तरी, लेखकाने

जाणिवपूर्वक केली असे म्हणता येत नाही. काल आणि स्थिती यांच्या अनुषंघाने कांही विचार प्रणाली साहित्यकृतीवर कळत नकळत प्रभाव गाजवित असतात. या लेखनातून अस्तित्ववादी विचार प्रणाली प्रमाणे मार्क्सवादी विचार प्रणालीचे दर्शन घडते. दलित साहित्याच्या पाठीशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा आहे. डॉ. आंबेडकरांनी योग्य बदलासह मार्क्सवादी विचारसरणी स्विकारली होती. आणि साम्यवादाचा पुरस्कार केला होता. साम्यवादाचे प्रमुख ध्येय शोषनमुक्त वर्गविहीन समाजरचना हे आहे. अशी समाज व्यवस्था वर्तमान स्थितीच्या पोटातच आहे. या समाज निर्मितीसाठी विशिष्ट राजकीय मार्ग आचरण्याची आवश्यकता मार्क्सने प्रतिपादन केली. मार्क्सने धर्म, निति, शासन संस्था याकडे पाहण्याचा एक प्रगतीवादी दृष्टिकोन निर्माण केला. वर्गविहीन, शोषनमुक्त समाज निर्माण करणे हे साहित्याचे प्रयोजन सांगितले. समाज मुल्यांनाच साहित्य मुल्य मानले व आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, वंशिक व दलितांच्या, शोषितांच्या जीवनाचे चित्रण करणे हे विचार प्रणालीने महत्त्वाचे मानले.

या दृष्टिकोनातून विचार करता प्रस्तुत लेखक एका संघर्षासाठी सिध्द झाला आहे. आपल्या समाजाचे जे शोषण होते ते थांबले पाहिजे. आपला समाज शिकला पाहिजे. इंग्रजांनी मारलेला त्याचा कपाळावरचा शिक्का पुसला पाहिजे. त्याने संघटीत झाले पाहिजे. संघर्ष केला पाहिजे. सवर्ण समाजाने देखील या समाजाकडे पाहण्याची असणारी 'उपभोग्य वस्तुची' दृष्टि बदलली पाहिजे. हा विचार व्यक्त केला आहे. अर्थात ही पोपटपंची नाही. तर प्रत्यक्ष कृती ही लेखक करतो. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी या दिवशीच्या कार्यक्रमात सुत गिरणीतील कामगाराच्या व्यथेला तो वाचा फोडतो. भटक्या विमुक्तांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या संदर्भात त्यांने विराट मोर्चा काढला आहे. वेळोवेळी वर्तमानपत्रातून लेखन करुन समाज जागृती केली आहे. अनेकवेळा पदरमोड करुन या अन्यायाचा प्रतिकार केला आहे. व्यापारी, सावकार, पोलिस या समाजाला लुबाडतात, ते शोषण थांबविण्यासाठी लेखक प्रयत्न करताना दिसतात. या सर्व प्रयत्ना मागे मार्क्सवादी विचारप्रणाली असल्याचे दिसते. या प्रयत्नाचा एक भाग म्हणून लातूर मधील बी बियाणाचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्याची गाढवावरुन धिंड काढलेली आहे. त्यावेळी एक हजार भर शेतकऱ्यांना त्यांनी मोफत बी बियाणे वाटले आहे. या समाजातील तरुणांना, स्त्रियांना पोलिस अधिकारी जेंव्हा जेंव्हा त्रास देतात, लाच मागतात, कारण नसताना गुन्हा लावून जेल मध्ये टाकतात, तेंव्हा त्या पोलिस अधिकाऱ्यांना लेखकाने जाब विचारला आहे. अनेकांची जेलमधून सुटका केलेली आहे. अनेकांना छोट्यामोठ्या नोकऱ्या लावलेल्या आहेत.

अशाप्रकारे शोषणमुक्त समाजाच्या निर्मीतीसाठी लेखक प्रयत्न करताना दिसतो. वस्तुच्या किमती योग्य असाव्यात यासाठी लेखक धडपडताना दिसतो. अर्थात ही मार्क्सवादी विचारप्रणाली असल्याचेच आपणाला दिसते.

४) **प्रांजळ निवेदन :** अस्मितेच्या शोधातून आत्मकथने लिहिली गेली असले तरी स्वबरोबरच, स्वसमाजही या लेखर्णातून साकार झालेला आहे. बऱ्याचदा प्रतिनिधी म्हणूनच लेखक वाचकासमोर येतो. त्यामुळेच आपापल्या समाजाच्या सांस्कृतिक, धार्मिक चालीरिती, परंपरा, भाषा इत्यादी सह केलेल्या चित्रणातून आत्मकथनाला एक वेगळाचा आकार प्राप्त होताना दिसतो. या लेखनात लेखकाच्या जीवनातील यशापशयाचा आलेख तर येतोच पण 'उचल्या' जातीची दु:खे ही साकार होतात. हा माणूस पिढ्यांपिढ्यापासून कसा नागवा आहे. व प्रस्थापित समाज, पोलिस अधिकारी, सावकार, धनदांडगे, पाटील लोक त्याला अधिक नागवे कसे करतात. याचे चित्रण आपल्यापुढे येते. या बरोबर हे सर्व बदलेले पाहिजे. सवर्ण समाजाने व इतरांनी 'माणूस' म्हणूनच या समाजाकडे पहावे ही रोखठोक भूमिका या ठिकाणी मानलेले आहे.

हे भुमिका मांडताना लेखकाने केलेले निवेदन अत्यंत प्रांजळ आहे. सत्य आहे. वस्तुस्थिती साकार करणारे आहेत. या निवेदनात कोणताही बडेजाव, सहानुभुती प्रसिध्दिची हाव नाही. आपल्या मनात आलेला पैशासाठी विष्ठा खाण्याचा विचार असो किंवा आपल्या वैणीवर ती अंगणात झोपली असताना कुणीतरी बलात्कार करण्याचा केलेला प्रयत्न असो, किंवा नवाड्या भाबीला कर्नाटकात नेवून दोनशे पन्नास रुपयाला विकल्याचा प्रसंग किंवा वर्गातील मुलांच्या भाकरी चोरुन खाण्याचा प्रसंग, शालेय कार्यक्रमात एका ठिकाणी इतरांच्या दबावामुळे आपण घेतलेली स्त्री विरोधी भूमिका या सर्व घटनांचे वर्णन अत्यंत प्रांजळपणे आपणासमोर मांडलेले आहे.

कोणतेही साहित्य रुप जेंव्हा वाङमयाच्या दालनात वाचकाचे लक्ष वेधून घेते. तेंव्हा त्यामागे विशिष्ठ भूमिका आणि प्रभावी प्रेरणा शक्ती असते. 'उचल्या'च्या जातीवर मारलेला गुन्हेगारीचा शिक्का व या समाजाचे इतराकडून होत असणारे शोषण. कांहीच कारण नसताना भोगावे लागणारे दु:ख नोंदविणे ही प्रमुख भूमिका या लेखना मागे आहे. आपला समाज सुधारावा तो इतराकडून पायदळी तुडविला जावू नये. त्याने शिकावे, संघटीत व्हावे, संघर्ष करावा अशी या लेखकाची अपेक्षा आहे. डॉ. आंबेडकराची प्रभावी नेतृत्त्व आणि युयुत्सु, वीजीगिषु, विचारसरणी दलित

समाजाला लाभली आणि वर्षानुवर्ष मूक असणारा हा समाज आपल्या व्यथा वेदना शब्द बध्द करु लागला. आपल्या सत्वाचा शोध घेवू लागला. यातूनच दलित लेखकांनी स्वत: निमित्त मात्र होवून समाजाचे प्रतिनिधीत्व करणारी आत्मकथने लिहली. एक नवा आकृति बंध निर्माण झाला. 'उचल्या' हा त्याचाच एक भाग आहे.

या आत्मकथनातील प्रसंग वर्णन व घटना 'उचल्या' जाती पुरत्याच मर्यादित आहेत. प्रसंग घटना विस्कळीत आहेत. वेळोवेळी अश्लिलतेचा वापर करुन हे लेखन झाले असल्यामुळे प्रसंगाचे गांभीर्य वाचकाच्या लक्षात आणून देण्याचा जो प्रयत्न लेखकाने केलेला आहे. तो अयोग्य आहे. या मर्यादा या लेखनाला पडल्या असल्यातरी दलित साहित्याचा एक भाग असणाऱ्या समाजापासून पिढ्यांपिढ्या, दारिद्रय, लाचारी, सतत भूके कंगाल राहून जीवन जगणाऱ्या एका समाजाची कहाणी या लेखनाच्या रुपाने एका वेगळ्या सांस्कृतिक जीवनाचा परिचय झाला आणि सवर्णाला आपले वैचारिक पंगूपण, शासन यंत्रणेला त्यांच्यातील भ्रष्टाचार समजला त्या दृष्टिने या लेखनाला एक वेगळे मुल्य प्राप्त झाले आहे.

# संदर्भ टीपा


१) हरपले श्रेय - रा.श्री. जोग - कॉन्टिनेटल प्रकाशन , प्र. आ. १९५६. पृ. १०५

२) छावणी हलते आहे - कर्मवीर प्रकाशन, ११/७ पार्क साईड कॉलनी विक्रोळी मुंबई प्र. आ. १९७७ पृ. ४८

३) 'उचल्या' - लक्ष्मण गायकवाड मनोगत, श्री. विद्याप्रकाशन २५० शनिवार पेठ, पुणे प्र. आ. १९८७ पृ. १८८,

४) उनि - पृ. १३.

५) उनि - पृ. ३

६) उनि - पृ. ११८

७) उनि - पृ. २१

८) उनि - पृ. २४.

९) उनि - पृ. १६२.

१०) उनि - पृ. मनोगत .

११) उनि - पृ. १९.

१२) उनि - पृ. ५३.